जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक **लोकनेता** बीड

गुरुवार दि.१० ऑक्टोबर २०२४

किंमत २ रुपये । महाराष्ट्र

मराठी दैनिक

वर्ष : ०२ अंक : ३७

टायटल कोड : एमएएचएमएआर५२६७६

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत संपादक : ज्ञानेश्वर मुंढे

सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४

Email : elokneta@gmail.com | Lokneta News - लोकनेता न्युज | 8459977904 | epaper.lokneta.in

# कार्यालयावरचे कमळ काढून पालकमंत्र्यांना दोष देणारे

# आ.पवार करोडोंच्या कामाचे उद्घाटन कसे करू लागले

## आमदार साहेब फक्त भूमीपूजन नको कधीतरी लोकार्पण करायला शिका

### ज्या स्व.मुंढे साहेबांनी तुम्हाला बोटाला धरून आमदार केले त्यांच्याच कुटुंबियांवर तुम्ही आरोप करता

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**गेवराई । प्रतिनिधी**

जसं जशी विधानसभा निवडणुक जवळ येत आहे तसं तसे आ. लक्ष्मण पवार यांचे विकास कामांच्या भूमिपूजनाचा धडाका मात्र जोरात चालू आहे. स्वतः च्या संपर्क कार्यालयावरून ज्या भाजपा पक्षाने आमदार केले त्या पक्षावर आरोप करून कमळ काढून टाकले हे सगळं भावनिक राजकारण आ. लक्ष्मण पवार यांना परवडेल का अशी चर्चा मात्र संपूर्ण मतदार संघात सुरू आहे. ज्या स्व. गोपीनाथरावजी मुंढे साहेबांनी आ. पवार यांना उमेदवारी देऊन बोटाला धरून आमदार केले त्याच मुंढे साहेबांच्या कुटुंबियांवर आ. पवार यांनी आरोप करायला सुरुवात केली. अशी चर्चा संपूर्ण गेवराई विधानसभा मतदारसंघात सुरू आहे. पाच वर्षे घरात बसणारे आमदार ऐन निवडणुकीच्या तोंडावर विकास कामांच्या भूमिपूजनाचा धडाका लावला आहे ही कामे एवढी मिळाली असताना आ. लक्ष्मण पवार पक्षाला व पालकमंत्र्यांना का दोष देत असतील? का फक्त भावनिक राजकारण करून निवडून येण्याचा डाव आहे का? आमदार पवारांना पराभव तर दिसत नाही ना? हे सगळं कशासाठी चाललं आहे असे अनेक प्रश्न गेवराई तालुक्यातील सामान्य जनतेला पडले आहेत. आमदार साहेब फक्त भूमीपूजन नको कधीतरी लोकार्पण करायला शिका कारण सामान्य जनतेला लोकार्पणाची आवश्यकता आहे भूमिपूजन करून दिशाभूल करणारे नेते गेवराईकरांना आजपर्यंत भरपूर भेटले आहेत मात्र तुमच्या कडून सामान्य जनतेला काही वेगळ्या अपेक्षा आहेत.



### व्वा रे आण्णा! लोकसभेला आजारी अन् विधानसभेला मात्र तब्येत बरी

आमदार लक्ष्मण पवार यांना वर्षभरापासून काही आजारामुळे त्यांची तब्येत ठीक नव्हती. आमदार लक्ष्मण पवार यांनी मी व माझ्या कुटुंबातील कोणीही विधानसभा निवडणुक लढवणार नाही असे स्पष्ट केले होते. मात्र तरीही आ. लक्ष्मण पवार हे निवडणूक लढवणार असल्याचे संकेत दिसून येत आहेत. लोकसभेला महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी आ. लक्ष्मण पवार जास्त काही सक्रीय दिसले नाही व गेवराई मतदारसंघातून महायुतीच्या उमेदवाराला लीड मिळाली नसल्याने आ. लक्ष्मण पवार यांच्यावर महायुतीचे बरोबर भाजपा पक्षही नाराज होता. मात्र विधानसभेच्या तोंडावर आ. पवार यांनी विकास कामांच्या भूमिपूजनाचा धडाका लावला आहे. त्यामुळे संपूर्ण गेवराई विधानसभा मतदारसंघात लोकसभेला आजारी अन् विधानसभेला मात्र तब्येत बरी अशी चर्चा दिसून येत आहे. हे सर्व भावनिक राजकारण करत असताना लक्ष्मण पवार निवडणूक लढवणार का? आणि जनता त्यांना तिसऱ्यांदा स्विकारेल का? हे ही पाहणे गरजेचे आहे.

## महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयात मतदार जनजागृती अभियान

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुखेड । शिवकुमार बिरादार**

मुखेड येथे महात्मा ज्योतिबा फुले महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग व तहसील कार्यालय आणि पंचायत समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मतदान जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता . मतदान हा भारतीय लोकशाहीचा महत्वपूर्ण अधिकार आहे . या उपक्रमात सहभागी होऊन लोकशाही बळकट करण्यासाठी प्रयत्न करावे असे नायब तहसीलदार सतीश जोहर यांनी प्रतिपादन केले .

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवानंद अडकिणे तर प्रमुख पाहुणे म्हणून तहसील कार्यालयातील निवडणूक विभागाचे नायब तहसीलदार सतीश जोहर , उपप्राचार्य प्रा.एस.बी.बळवंते , स्वीप कक्ष प्रमुख एस.एस.करेवाड तसेच मुजावर , कपिल गरुडकर हे उपस्थित होते . प्रास्ताविक एस.एस.करेवाड , सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा.डॉ. चंद्रकांत एकलारे तर आभार प्रदर्शन रासेयो स्वयंसेविका कु.क्रांती सोनकांबळे यांनी केले .महात्मा फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रम सुरू झाला . मान्यवरांचा यथोचित सत्कार यावेळी करण्यात आला . मतदार प्रतिज्ञा उपस्थित सर्वांना देण्यात आली . नायब तहसीलदार जोहर यांनी मतदान करत असताना कसल्याही अमिषाला बळी पडू नये . आपल्या बरोबर नोंदणीकृत प्रत्येक मतदाराला जागृत करण्याची जबाबदारी स्वीकारावी असे सांगितले . अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. अडकिणे यांनी आमच्या महाविद्यालयाकडून निवडणूक आयोग , शासन व विद्यापीठ यांनी निर्देशित केलेले अनेक शैक्षणिक , सामाजिक व राष्ट्रीय कर्तव्य पार पाडत असतो . मतदान करताना मतदार जर स्वयंस्फूर्तीने सहभागी झाला तर राष्ट्र बळकट होतो . प्रत्येक जण मोबाईलचा वापर राष्ट्र हिताच्या उपक्रमाचा प्रचार – प्रसार करण्यासाठी करावा . भविष्यात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व निवडणूक विभाग असे उत्तमोत्तम कार्यक्रम आयोजित करावे . लोकजागृती होणे काळाची गरज आहे . जात , धर्म , पंथ , वंश या चक्रात अडकण्याऐवजी राष्ट्र प्रेम जपण्याची ही सुवर्ण संधी आहे असे मार्गदर्शनातून विचार मांडले . यावेळी बहुसंख्येने प्राध्यापक , शिक्षकेत्तर कर्मचारी , राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होते .

## बिबट्याच्या हल्ल्यात पिंपरी पेंढारला ४० वर्षीय महिला ठार

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**जुन्नर । मयूर ढोबळे**



जुन्नर तालुक्यातील पिंपरी पेंढार गावच्या हद्दीत डेरेमळा येथे बुधवार दि.९ रोजी सकाळी ६ वाजता बिबट्याने हल्ला करून महीलेले ठार केले.अधिक माहिती अशी की पिंपरी पेंढार येथील डेरेमळा येथे सुजाता रवींद्र डेरे (वय ४०)ही महिला सकाळी ६ वाजता उठून घरा बाहेर आल्यावर लघुशंकेसाठी गेली असता बिबट्याने झडप घालून मोठ्या प्रमाणात जखमी करून घरापासून १०० फूट ओढत नेऊन ठार केले असल्याचे स्थानिकांनी सांगितले. या घटनेमुळे पिंपरी पेंढार व आजूबाजूच्या गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे अशी घटना झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे, बिबट्यामुळे नाहक बळी जात असल्याने नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. घराबाहेर पडायचे के नाही असा सवाल ग्रामस्थांतून येत आहे, दिवसेंदिवस जुन्नर तालुका बिबट्यामुळे भीतीच्या छायेत आहे बिबट्या आमच्या जुन्नर तालुक्यात नको असतील त्या बिबट्याची नसबंदी करा आशा भावना नागरिकांमध्ये निर्माण होत आहे.


तत्परतेने उपवनसंरक्षक अमोल सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली वनपरिक्षेत्र अधिकारी प्रदीप चव्हाण जुन्नर वनविभागाची टीम पिंपरी पेंढार येथे आली असून पिंजरे लावण्यात आले असून रेस्क्यू टीम बिबट्याचा शोध घेत आहे.ओतूर पोलीस देखील घटनास्थळी पोहोचले आहेत.

## रतन टाटा यांचे वयाच्या ८६ व्या वर्षी निधन

### दानशूर उद्योगपती हरपला

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**मुंबई (वृत्तसंस्था)**



ख्यातनाम उद्योगपती रतन टाटा यांचं निधन झालं आहे. वयाच्या ८६ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. मुंबईतील रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. टाटा यांना रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचं वृत्त सोमवारी आलं होतं. त्यानंतर रतन टाटांनीच त्यांच्या प्रकृतीबद्दलची माहिती दिली होती. वाढत्या वयामुळे नियमित वैद्यकीय तपासणी होत असल्याचं टाटांकडून सांगण्यात आलं होतं. आज संध्याकाळी त्यांची प्रकृती गंभीर असल्याचं वृत्त आलं. त्यानंतर त्यांच्यासाठी देशभरातून प्रार्थना सुरु होत्या. आयसीयूमध्ये त्यांच्यावर उपचार सुरु होते. काही वेळापूर्वी त्यांची प्राणज्योत मालवली.

रतन टाटा यांच्यावर मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात उपचार सुरु होते. बुधवारी संध्याकाळी त्यांची प्रकृती बिघडली. काही वेळातच त्यांनी जगाचा निरोप घेतला. रतन टाटांच्या निधनानं देश शोकसागरात लोटला गेला आहे. टाटा रुग्णालयात गेले असल्याचं वृत्त सोमवारी आल्यानंतर अनेकांनी चिंता व्यक्त केली. अनेकांनी त्यांच्यासाठी प्रार्थना केल्या. आज संध्याकाळी त्यांची प्रकृती नाजूक असल्याचं वृत्त आलं होतं. त्यानंतरही देशभरातून प्रार्थना सुरु झाल्या. टाटांनी देशासाठी दिलेलं योगदान मोलाचं आहे.

संवेदनशीलपणा कायम जपणारा, सढळ हस्तानं मदत करणारा उद्योगपती अशी रतन टाटांची ओळख होती. आयुष्यभर त्यांनी ती जपली. त्यांचा साधेपणा अनेकांसाठी कुतूहलाचा विषय राहिला. टाटा आयुष्यभर साधेपणानं जगले. टाटा समूहानं कोणताही उद्योग सुरु करताना आधी देशाचा विचार केला. देशाच्या गरजा लक्षात घेऊन त्यांनी अनेक उद्योग सुरु केले. समूहाची ही परंपरा टाटांनी कायम ठेवली.

### धर्माबाद तालुक्यातील सन २०२३ च्या खरीप हंगामातील

## कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये तात्काळ अनुदान वर्ग करण्यात यावे-नागनाथ माळगे

**लोकनेता न्यूज नेटवर्क**

**धर्माबाद । साहेबराव दुगाने**



धर्माबाद तालुक्यातील व शहरातील १ फेब्रुवारी २०१९ नंतर फेरफार केलेल्या शेतकऱ्यांना पी. एम किसान योजना व नमो शेतकरी सन्मान निधी या दोन्ही योजनेपासून तालुक्यातील व शहरातील असंख्य शेतकरी वंचित आहेत व सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पिक पाहणी पोर्टलवर नोंदीत कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना असंख्य शेतकरी वंचित असल्यामुळे त्यांच्या खात्यामध्ये अनुदान वर्ग करावे व खरीप हंगाम २०२३ च्या सातबारा उतारा वर नोंद आहे मात्र ई पीक पाहणी मध्ये त्यांचे नाव आलेले नाही अशा वंचित शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यामध्ये तात्काळ मध्ये अनुदान वर्ग करण्यात यावे अशा अशा प्रमुख तीन मागण्या सामाजिक कार्यकर्ते नागनाथ पाटील माळगे यांनी तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांच्या माध्यमातून जिल्हाधिकारी महोदयाकडे लेखी निवेदनाद्वारे केले आहेत . २०१९ नंतर फेरफार केलेल्या धर्माबाद तालुक्यातील व शहरातील शेतकऱ्यांना न्याय मिळेल का? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. जवळपास चार वर्ष संपले तरी शेतकऱ्यांना या दोन्ही योजनेचा लाभ मिळत नसेल तर अडचणी काय ? हे तरी कळवा व सदरील शेतकरी २०१९ नंतर फेरफार केलेल्या पी. एम.किसान योजना व नमो शेतकरी सन्मान निधी या दोन्ही योजनेचा लाभ मिळत नसल्याने दोष कुणाचा असा प्रश्न धर्माबाद तालुक्यातील व शहरातील शेतकऱ्यांना पडला आहे या दोन्ही योजनेचा शेतकऱ्यांना लाभ मिळवून द्यावा तथा सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पिक पाहणी पोर्टलवर नोंदीत कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना असंख्य शेतकरी वंचित असल्यामुळे त्यांच्या खात्यामध्ये तात्काळ मध्ये अनुदान वर्ग करण्यात यावे व खरीप हंगाम २०२३ च्या सातबारा उतारा नोंद आहे मात्र ई पीक पहानी मध्ये त्यांचे नाव आले नाही अशा वंचित असलेल्या शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यामध्ये अनुदान वर्ग करण्यात यावे तथा तथा १ फेब्रुवारी २०१९ च्या नंतर फेरफार केलेल्या तालुक्यातील व शहरातील असंख्य शेतकरी पीएम किसान योजना व नमो शेतकरी सन्मान निधी या दोन्ही योजनेपासून वंचित असलेल्या शेतकऱ्यांना तात्काळमध्ये योजनेचा लाभ मिळावा माझी शासनाला विनंती आहे तालुक्यातील व शहरातील माझ्या मायबाप शेतकऱ्यांच्या प्रमुख तीन मागण्या आहेत हे तीन मागण्या तात्काळ मध्ये मार्गी लावून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी नागनाथ पाटील माळगे रोशनगावकर यांनी केली आहे.

**झाडे लावा झाडे जगवा**

### चारोळी

कितीही खडतर वाटा येवोत
तू निर्भीडपणे चालत रहा
आठव दुर्गेचे रूप आणि
खचलेलीही सोबत घेऊनी जा.

रंजना सानप
मायणी (सातारा)





हरिद्वार येथे मुख्य योग शिक्षक प्रशिक्षण निमित्त जगप्रसिद्ध योगाचार्य बाबा श्री रामदेव व परमार्थ देवजी यांचा आशीर्वाद घेते वेळी महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ नांदेड जिल्हा निवड समिती अध्यक्ष श्री मोहन पाटील पवार व सर्व मित्र परिवार(छाया लोकनेता न्यूज नेटवर्क लोहा)



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राज्यसभा खासदार नितीन काका पाटील सातारा जिल्हा यांची भेट घेतली असता शेतकरी नेते मारोतराव कवळे गुरुजी संदीप पाटील कवळे परमेश्वर पाटील कवळे करकाळेकर मामा भगवान चव्हाण भाजपा माजी तालुकाध्यक्ष नायगाव

# गोपीनाथराव मुंडे साहेब सारखा नेता पुन्हा होणे नाही....!

डझनने नेते झाले वेगवेगळ्या सामजामध्ये. अनेकांनी मुंडे साहेबा सारखं होण्याचं बघितलं. सगळी हयात गेली पण मुंडे साहेबा सारख होणे कुणाला जमले नाही आणि भविष्यात सुद्धा जमणार नाही. लाख येथील, लाख जातील पण समाजाचं भलं करणारा मुंडे साहेब सारखा परत कोणी होणार नाही. काय दिले मुंडे साहेबांनी? स्वाभिमान दिला, जगण्याचा अधिकार दिला, अन्याय सहन न करण्याची ताकद दिली, आजही समाजातील सर्व वर्गातील शेतकरी, व्यापारी, नोकरदार, मजूर सर्वजण स्वाभिमानाने जगत आहेत. कुठल्याही नेत्याची हुजरेगिरी आणि मुजरेगिरी आयुष्यात कधी या लोकांनी केली नाही. यांचा एकच नेता आहे ते म्हणजे मुंडे साहेब. ज्यांनी हुजरेगिरी केली त्यांचं रक्त कदाचित दुसऱ्याच असू शकत. मुंडे साहेबांचे संस्कार नसानसात भिनलेले आहेत ह्या सगळ्या लोकांच्या. राजा माणूस होते मुंडे साहेब.राजा म्हणून जन्माला आले,आणि राजा म्हणूनच गेले. त्यातली त्यात तिरंगा अंगावर घेऊन गेले. सगळ्या जगाला दाखवलं की, एक ऊसतोड कामगाराच्या घरामध्ये जन्मणारा व्यक्ती किती मोठा नेता होऊन झाला . हे चार जून २०१४ ला साहेबांच्या अंत्यविधीसाठी परळीत उसळलेल्या जनसागरातून सगळ्या जगाने बघितले. प्रत्येकजण टाहो फोडत होता, प्रत्येक व्यक्ती घरातील सदस्य गेल्याप्रमाणे गगनभेदी किंकाळी फोडत रडत होता. एवढा मोठ प्रेम हे फक्त गोपीनाथ मुंडे साहेब या नावालाच भेटले आहे. त्यानंतर कुणाला नाही. मुंडे साहेबांवर अनेक आघात झाले,अनेक वेळा राजकारणात धोके पचवले, अनेक वेळा अपमान सहन केला, अवहेलना सहन केली,पण हा माणूस कधी कुणाचा लाचार झाला नाही. ताठ मानेना जगले. कारण स्वाभिमान त्यांच्यामध्ये रक्तामध्ये ठासून भरलेला होता. गोष्टी बोलायच्या नव्हत्या पण काळानुसार आणि वेळेनुसार काही गोष्टी बोलाव्या लागतात. होय मुंडे साहेबांनी स्वतःच्या समाजासहित इतर अठरापगड जातीच्या लोकांना न्याय दिला. आयुष्यभर त्यांच्यासाठी काम करत राहिले त्यांच्या दारात आलेल्या माणसाचं भलेही त्यांच्याकडून काम होऊ नये पण त्यांना कधी नकार दिला नाही. होय मुंडे साहेबांनी गृहमंत्री पदाच्या कार्यकाळामध्ये स्वतःच्या जातीच्या लोकांना अधिकारी होण्याचे स्वप्न दाखवले. फक्त ऊसतोड करून चालणार नाही. याच्यासाठी नोकरी केल्याशिवाय पर्याय नाही. आणि म्हणूनच समाज प्रबोधनकार ऐश्वर्य संपन्न संत भगवानबाबांनी शिक्षणाचे महत्त्व या अठरापगड जातीच्या लोकांना पटवून दिले. भरकटलेल्या समाजाला शिक्षणाच्या प्रवाहात आणले आणि समाज शिक्षित केला. नारायण गडावर जातीयवादी लोकांनी नको ती आरोप करून नारायण गड सोडायला भाग पण तेवढ्यावर न थांबता मुंडे साहेबांनी झाडाझुडपांनी काट्यांनी व्यापलेला धौम्य गडाचा डोंगराचा कायापालट करून त्या ठिकाणी पृथ्वीवरील स्वर्ग भगवानगड स्थापन विठ्ठलाच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि भगवानगड नावारुपास आला.त्यांच्या नंतर मुंडे साहेबांनी शिक्षित झालेला समाज नोकरदार



केला पाहिजे याच्यासाठी कायम प्रयत्न केले. आणि आज या समाजातील समाजातीतील लोक मोठ्या पदावर आपल्या कामाचा ठसा उमटवत आहेत. त्याचबरोबर राजकारणामध्ये वेगवेगळी पदे भूषवलेली. कुठलाही राजकीय वारसा नसताना दोन टक्के समाजातील नेता महाराष्ट्राचं जेव्हा नेतृत्व करतो तेव्हा त्या समाजात लोक किती पुढारलेले आहेत याची प्रचिती येते. भाजपा युवा मोर्चाचे प्रदेशाध्यक्ष, भाजपाचे प्रदेशाध्यक्ष, आमदार , विरोधी पक्षनेता,उपमुख्यमंत्री, गृहमंत्री, खासदार,लोकसभेतील उपनेता आणि केंद्रीय ग्रामविकास मंत्री इथपर्यंतचा प्रवास थक्क करणारा होता. पण परिणामी केंद्रात मंत्री झाल्याच्या नंतर नियतीने त्यांच्यावर घाला घातला आणि भरल्या ताटावरून मुंडे साहेबांना उठवले. मुंडे साहेबांचे जाणे हे महाराष्ट्राच्या दृष्टीने नुकसानकारक होते. पण नियतीपुढे कोणाचे काही चालत नाही असं म्हणतात ना. आगदी तसेच.. पण राजकारणातील आणि समाजकारणात त्यांची जागा भरून काढण्यासाठी आपल्या राजकीय वारसदार म्हणून पंकजाताई पुढे आल्या आपल्या वडिलांना मुखाग्नी देताना शपथ घेतली की, मुंडे साहेब हे नाव मी जगाला विसरून देणार नाही. वडिलांच्या निधनानंतर चौदाव्या दिवशी बाहेर पडल्या डोंगराएवढं दुःख बाजूला सारून कामाला लागल्या, मुंडे साहेबांवर प्रेम करणाऱ्या लोकांना भेटून एक आशेचा किरण म्हणून पंकजाताई मुंडे साहेब यांच्या पाऊलावर पाऊल ठेवून काम करत राहिल्या. २०१४साली सिंदखेडराजा ते चौंडी अशी संघर्ष यात्रा कडून ह्या महाराष्ट्रामध्ये सत्ता परिवर्तन करण्यामध्ये पंकजाताई मुंडे यांचा सिंहाचा वाटा राहिला आहे. राज्यात सत्ता परिवर्तन झाल्याच्या नंतर पंकजाताई यांना ग्रामविकास मंत्री खात्याची जबाबदारी सोपवण्यात आली आणि आपल्या पाच वर्षाच्या कार्यकाळामध्ये अनेक कामे पंकजाताईंनी केले. धार्मिक स्थळांना मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून दिला धार्मिक स्थळाचा कायापालट केला. पुढे २०१९ मध्ये अल्पशा मतांनी ताईचा पराभव झाला तर समाजकार्याचा वसा कायम तेवत ठेवला. तो अजतायगत सुरू आहे.मुंडे साहेबांना ज्याप्रमाणे मोठी केलेली माणसे सोडून गेली होती त्याचप्रमाणे ताईला सुद्धा त्याच परिस्थितीला सामोरे जावे लागले.समाजकारण कायम सुरू ठेवल.. मुंडे साहेबांवर ज्याप्रमाणे लोकांनी प्रेम केले अगदी त्याचप्रमाणे लोक आज पण ताईवर प्रेम करत आहेत आणि करत राहतील.लाख येतील लाख जातील पण मुंडे साहेब आणि त्यांची राजकीय वारसदार पंकजाताई पुन्हा कोणी होणार नाही.कोणी कितीही प्रयत्न करा काही होणार नाही कारण की मुंडे साहेब आणि मुंडे साहेबांची पुण्याई एवढी मोठी आहे की त्यांच्या पुण्याईने यापुढेही महाराष्ट्राचे राजकारण अपूर्णच राहणार आहे. शेवटी जाता जाता एवढं सांगेल मुंडे साहेबांनी दसरा मेळाव्याची सुरू केलेली परंपरा भक्ती आणि शक्तीची परंपरा यापुढेही कायम ठेवायची आहे. येणाऱ्या दसरा मेळाव्याला सर्वांनी लाखोच्या संख्येने दरवर्षीप्रमाणे उपस्थित राहायचे आहे पंकजाताईचे हात आपल्याला मजबूत करायची आहे. आपला दसरा आपली परंपरा कायम सुरू ठेवायची आहे.

होय आजही आम्ही सिंहासारखे गर्जू पाहतो,
साहेबांचा ध्यास आमच्या रक्तात वाहतो
बाकीचे तुम्ही कितीही ओरडा आमचा विठ्ठल परळीत राहतो..

**–ज्ञानदेव एम थोरे**

# शासकीय आय.टी.आय.ला डॉ.भाई केशवराव धोंडगे यांचे नाव

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

कंधार तालुक्यातील फुलवळ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेला जेष्ठ स्वतंत्र सेनानी, शिक्षणमहर्षी माजी खासदार व माजी आमदार डॉ.भाई केशवराव धोंडगे यांचे नाव देण्यात आले.या बाबतची घोषणा महाराष्ट्र शासनाच्यावतीने नुकतीच करण्यात आली.शासनाकडून भाईंच्या शैक्षणिक व सामाजिक कार्याची दखल घेण्यात आल्याने तालुक्यासह जिल्ह्यातील जनतेत आनंद व्यक्त केला जात आहे.

भाई धोंडगे यांनी आपले संपूर्ण आयुष्य दलीत, पददलित,अपेक्षित, नाहिरेवाल्यांसाठी वेचले. विधानसभेत त्यांनी सतत ३० वर्ष कंधारचे नेतृत्व केले. नांदेडचे



खासदार म्हणूनही ते निवडून आले होते. अन्यायाविरुद्ध पेटून उठणारा लोकप्रतिनिधी म्हणून त्यांची ओळख होती. त्यांनी आयुष्यभर शासनाच्या धोरणावर आसूड ओढले. हैद्राबाद संस्थान खालसा झाल्यावर त्यांनी कंधार सारख्या डोंगर कपारितल्या तालुक्यात शैक्षणिक संस्थेची मुहूर्तमेढ रोवली.

ग्रामीण भागातील मुले शिकली पाहिजेत हा उद्दात हेतू डोळ्यासमोर ठेऊन त्यांनी कंधार शहर,तालुक्यातील वाडी तांड्यासह लोहा, सोनखेड, नांदेड,औरंगाबाद (छत्रपती संभाजी नगर) येथे शाळा, महाविद्यालयांची स्थापना केली. ग्रामीण भागातील मुलांना कायद्याचे ज्ञान मिळावे यासाठी त्यांनी शासन दरबारी भांडून कंधार मध्ये विधी महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांच्या या सर्व कार्याची दखल घेऊन शासनाने फुलवळ येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्राला त्यांचे नाव देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला.

### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचा आगळावेगळा उपक्रम

# जि.प.प्रा.शाळेत वृक्ष लागवड व शालेय उपयोगी साहित्याची केली वाटप

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई श्रीगोंदा सदस्यांचा ओळखपत्र वाटप कार्यक्रम सोमवार दिनांक ७ ऑक्टोबर २०२४ रोजी कुकडी गेस्ट हाऊस पेडगाव रोड श्रीगोंदा येथे जिल्हाअध्यक्ष दत्ता गाडगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.



यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ श्रीगोंदा यांच्या वतीने जि.परीषद प्राथमिक शाळा खेतमाळीस मळा (सुपेकर मळा) सावतानगर श्रीगोंदा येथे शाळेच्या आवारात वृक्ष लागवड करुन प्रत्येक विद्यार्थ्याला एक झाड व शालेय उपयोगी साहित्यांचे वाटप करण्यात आले.

यावेळी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष दता गाडगे, तालुका अध्यक्ष माधव बनसुडे, उपाध्यक्ष भिमराव उलहारे, सचिव डॉ अमोल झेंडे,अमर घोडके, किशोर मचे जावेद इनामदार, सचिन शिंदें,डॉ शिवाजी पवळ, नितिन रोही, ज्ञानेश्वर येवले, सोहेल शेख,अनिल तुपे, वैभव हराळ सह अनेक पत्रकार, शिक्षक पालक,व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते मुख्याध्यापक श्री शरद तरटे, सुधीर तरटे यांनी सन्मान करुन सर्वांचे आभार मानले.

# अतिउच्च विद्युत वाहिनीच्या मनोऱ्याखाली परवानगी देऊन मलीदा खाणारा अधिकारी कोण?

### वासुंदे परीसरात मनोऱ्याखाली खनिकर्म अधिकारी यांनी उत्खनन परवागनी दिली कशी?

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

वासुंदे ता.दौंड व परीसरातील स्टोन क्रशरला खनिकर्म अधिकारी यांनी परवानगी दिलीच कशी ? हा प्रश्न येथील जनतेला पडला असून या ठिकाणी मोठी दुर्घटना होण्याची शक्यता असताना देखील अधिकारी आणि क्रशर मालक यांचं साटंलोटं आहे का ? महापारेषाण विभागाची परवानगी न घेता उत्खनन केलेच कसे यांच्यामध्ये नक्की कोणाची भागीदारी आहे का? वासुंदे येथील ग्रामस्थ हनुमंतराव जांबले यांनी तक्रार करूनही काहीच कारवाई अधिकारी का करत नाहीत.



मनोऱ्या खालील उत्खनन बाबतची व क्रशर युनिटची तक्रार करूनही अजूनही क्रशर चालूच आहेत.मग महसूल विभाग नक्की कोणाचं हित पाहत आहे.

कित्येक वर्ष झाले हे बेकायदा उत्खनन चालूच आहे क्रशर मालकांना नक्की कोणाचा आशीर्वाद आहे का? या खडी क्रशर मालकावर गुन्हे दाखल करण्यास सांगून पण पुढे काहीच कारवाई होत नाही.मनोऱ्याखाली आजूबाजूला परिसरामध्ये बोर ब्लास्टिंग साठी परवानगी नसताना सर्रास बोर ब्लास्टींग चालूच आहेत.मनोरा पाडण्याच्या अवस्थेत असून देखील येथे जिवित हानी झाल्यावरच कारवाई होणार का?असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे मग हे गेंड्याच्या कातडीचे प्रशासन हजारो जीव जाण्याची वाट पाहत आहे का! याला कोणाचा आशिर्वाद आहे.हा मोठा खंबीर प्रश्न येथील नागरिकांना पडलेला आहे.हनुमंत जांबले म्हणाले की येथील अतिउच्च विज वाहिनीच्या खालीच बोर ब्लास्टिंग आणि उत्खनन झाल्याने येथील कामगारांचा,ग्रामस्थांचा जीव टांगणीला लागलेला आहे.तरीही प्रशासन काही कारवाई करत का नाही.मग एवढी मोठी दुर्घटना होण्याच्या मार्गावर असताना उघड्या डोळ्याने पाहणारा आणि मलिदा खाणारा अधिकारी कोण ? असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे.

# दत्त सेवा दुर्गा नवरात्र महोत्सव होळीनगर पेठवडज





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

पेठवडज सारख्या ग्रामीण भागात उत्साहात नवरात्रोत्सव दत्त सेवा दुर्गा नवरात्र महोत्सव मंडळाच्या वतीने सतत नऊ दिवस महाप्रसादाचे वाटप केले जात आहे. जय हनुमान मित्र मंडळ आयोजित दत्त सेवा दुर्गा नवरात्र महोत्सव होळीनगर पेठवडज येथे दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी मंडळाच्या वतीने देवी ची आकर्षक मुर्तीची स्थापना करण्यात आली आहे. या नवरात्रीच्या नऊ दिवसाच्या कालावधीत नवरात्रीत मंडळाकडून विविध प्रकारचे सामाजिक उपक्रम राबविले जातात यावर्षी पण राबविणार अशी माहिती, पेठवडज नगरीतील सामाजिक, धार्मिक कार्यात अग्रेसर भुमिका घेणारे जय हनुमान मित्र मंडळ होळीनगर पेठवडज यांनी यावेळी दिली आहे.सर्वात मोठे दान अन्नदान असून येथे पहावयास मिळत आहे.

# शिक्षक भारती संघटनेनी केली मा.उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल

### बदली मान्यतेसाठी मंत्रालयात जाणे अन्यायकारक-रूपाली कुरुमकर

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**


विनाअनुदानित वरून अनुदानित पदावर बदली करण्याचा एक चांगला निर्णय शासनाने घेतला होता सदर निर्णयाची अंमलबजावणी ही ०८ जून २०२० व ०१ एप्रिल २०२१ चे नियमानुसारच होत होती या निर्णयामुळे विनाअनुदानित शिक्षकांना अनुदानित पदावर जाण्याचा लाभ मिळत होता परंतु विनाअनुदानित बांधवांचे अनेक वर्षापासून जो संघर्ष चालू होता त्याला कुठेतरी आनंद मिळत आहे हे शासनाला बघवले गेले नाही व त्यांनी ०१ डिसेंबर २०२२ च्या शासन परिपत्रकाद्वारे सदर चांगल्या निर्णयाला स्थगिती दिली. अशा बदली केलेल्या प्रकरणातील अनेक न्यायालयीन प्रकरणे झाले व मा. न्यायालयाने या ०१ डिसेंबर २०२२ च्या शासन निर्णयाला स्थगित उठवावी असा शासनाला आदेश दिले तसेच मा. न्यायालयाच्या आदेशानुसार शिक्षक भारती संघटनेने स्थगिती उठवण्यासाठी शिक्षणा आयुक्त, शिक्षण संचालक, मंत्रालय वेळोवेळी पाठपुरावा केला परंतु मग्रूर व भ्रष्ट अधिकाऱ्यांनी उडवा उडवीची व टोलवाटोलची उत्तरे दिली विनाअनुदानित बांधवांची अनुदानित पदावर बदली व्हावी अशी शासनाची इच्छाच नसल्यामुळे त्यांनी फक्त टाळाटाळ केली या संदर्भात काहीच ठोस पावले उचलले नाहीत त्यामुळे अशी शेकडो बदली प्रकरणी शिक्षण अधिकारी व शिक्षण उपसंचालक कार्यालयात पडून राहिले. त्यातील अनेक शिक्षक बांधव वेगवेगळ्या उच्च न्यायालयात खंडपीठात गेले त्या संदर्भात संबंधित अधिकाऱ्यांना खडसावले एकदा दिलेल्या निर्णयावर आपण काही कार्यवाही न करता शिक्षकांवर वारंवार न्यायालयात पाठवता असे देखील सांगितले, अधिकाऱ्यांना दंड देखील केले परंतु शासनाने स्वतःहून यावर काहीच कारवाई केली नाही शेवटी मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार व वेळोवेळी अधिकारी मा.न्यायालयात आलेले अनुभव त्यांनी शासन निर्णय आणून दिले तेव्हा कुठे फक्त मा.न्यायालयाला दाखवण्यासाठी शासनाने क्षेत्रीय अधिकाऱ्यांची अधिकार काढून अधिकाऱ्याची केंद्रीकरण करणारे २९ एप्रिल २०२४ रोजी स्थगिती उठवली असल्याबाबतचे परिपत्रक काढले व सर्व प्रस्ताव शासनास मागून घेत असल्याचे मा. न्यायालयाला सांगितले २९ एप्रिल नंतर क्षेत्रीय कार्यालयात दाखल झालेले प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यास सुरुवात झाली व शेकडो प्रकरणे शासनाकडे जमा झाले.

शासनाने यावर ताबडतोब निर्णय घेणे अपेक्षित असताना २९ एप्रिल २०२४ पासून ऑक्टोबर महिन्यापर्यंत म्हणजे एकूण ०६ महिने शासनाने यावर काहीच कारवाई केली नाही निव्वळ वेळ काढून पणा केला शिक्षक भारती संघटनेच्या माध्यमातून आम्ही यावर शासनाने शासनाकडे वेळोवेळी विचारणा केली असता त्यावर काम चालू आहे लवकरच पत्र निघेल असे सांगण्यात येत होते आता शेवटी ०३ ऑक्टोबर २०२४ रोजी शासनाने एक परिपत्रक काढले व सदर वैयक्तिक मान्यता सूचीनुसार आपणास मंत्रालयात घ्यावी लागेल म्हणजे मंत्रालयाची पायपीट सर्व कर्मचाऱ्यांना या ठिकाणी करावी लागणार आहे हा अन्यायकारक निर्णय आहे यावर शिक्षक भारती संघटना अहमदनगर यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद येथे न्याय मिळण्यासाठी याचिका दाखल केलेली आहे ज्या कर्मचाऱ्यांना १८,२० वर्ष होऊनही पगार चालू नाही शासनाच्या सक्षम प्राधिकार्याने मान्यता देऊनही त्यावर संशय व्यक्त करून शालार्थ आयडी साठी प्रचंड आर्थिक लूट केली जात आहे.

एका बाजूने पवित्र पोर्टल च्या माध्यमातून शासन पारदर्शक भरती प्रक्रिया राबवली जात आहे असे सांगितले जाते परंतु दुसऱ्या बाजूने त्याच शासनाचे अधिकारी हे प्रचंड भ्रष्ट कारभार करून शिक्षण विभागात सावळा गोंधळ निर्माण करत आहे याला कुठलाही प्रकारचा आळा मंत्र्यांकडून किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून मिळत नाही त्यामुळे शिक्षक भारती संघटनेने मा. उच्च न्यायालयात जाण्याचा मार्ग स्वीकारला असून न्यायालयातच सदर शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त केली आहे या मागणीसाठी विनाअनुदान विरोधी संघर्ष समितीचे राज्याध्यक्ष जयवंत भाबड,राज्य सचिव सुनील गाडगे,जिल्हाध्यक्ष रामराव काळे, सरचिटणीस महेश पाडेकर, महिला जिल्हाध्यक्षा रूपाली कुरुमकर, जिल्हा उपाध्यक्ष सचिन जासूद,दादासाहेब कदम, कोषाध्यक्ष गोपाळ दराडे, प्रसिद्धीप्रमुख अमोल चंदनशिवे ,तालुका अध्यक्ष संजय सुमंत शिंदे, नरेंद्र लहिरे, संजय भालेराव, नानासाहेब खराडे, रूपालीताई बोरुडे, मफीज इनामदार,कल्पना चौधरी, अकील फकीर आधी पदाधिकारी यांनी पाठिंबा दिला.

# सोनाई परिवार आयोजित होम मिनिस्टर,खेळ रंगला पैठणीचा कार्यक्रमाला महिलांची प्रचंड गर्दी







■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**इंदापूर । बबनराव धायतोंडे**

भिगवण ता.इंदापूर येथील महिलांसाठी प्रविण माने मित्र परिवाराच्या वतीने आयोजित करण्यात आलेला होम मिनिस्टर खेळ रंगला पैठणीचा हा कार्यक्रम पार पडला.भिगवण येथील व्यंकटेश लॉन्स येथे आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात भिगवण व परिसरातील महिला वर्गाने आवर्जून मोठ्या संख्येने उपस्थिती लावलेली पाहायला मिळाली. या कार्यक्रमात सहभागी झालेल्या प्रत्येक महिलेस मानाची पैठणी साडी भेट देण्यात आली. तर प्रमुख बक्षिसांमध्ये प्रथम क्रमांकाच्या पारितोषिक साठी एल इ डी टी व्ही, द्वितीय पारितोषिक फ्रीज,तिसऱ्या क्रमांकासाठी कुलर,तर चौथ्या क्रमांकाला पिठाची चक्की आणि पाचवे पारितोषिक मिक्सर देण्यात आला. काळेवाडी नं. २ च्या शिवानी सौरभ काळे यांना प्रथम क्रमांक,तक्रारवाडीच्या सोनाली सागर बनसोडे यांना दुसरा क्रमांक, कुंभारगावच्या अश्विनी महेश काशीद यांना तिसरा क्रमांक,शेटफळगडे च्या नीता ज्ञानदेव करे यांना चौथा क्रमांक,तर डाळज नं ३ च्या तारामती संभाजी जगताप यांना पाचव्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले. अनिकेत निंबाळकर,किरण लावंड,मनोहर बापू हगारे,आप्पासो गायकवाड,दादासाहेब थोरात, विजया कोकाटे,जयश्री धुमाळ,आम्रपाली बंडगर,आकाश बंडगर, कुंडलिक धुमाळ, दादासाहेब मारकड,विजयकुमार गायकवाड,प्रदीप गायकवाड,पंकज काशीद,नानासाहेब धापटे, मकरंद जगताप,संजय मोरे,श्रीकांत काशीद, लालासो बंडगर,दादा जाधव,धनाजी थोरात, रूपाली रणदिवे,हेमाताई माडगे,मंजिरी लावंड, वंदना शेलार,तृप्ती देशमुख,सुजाता सोनवणे, गीता दराडे,तरन्नुम शेख,सुजाता राक्षे,शिवाजी जगताप, मनीषा ढोले,रेखा पाचंगणे,जयश्री गायकवाड व संपूर्ण माने कुटुंबीय आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# कंधारच्या व्यापाऱ्यांचा १२ वर्षांचा वनवास संपला

## प्रा.मनोहर धोंडे यांच्या पाठपुराव्याला अखेर यश

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

अतिक्रमणाच्या नावाखाली १२ वर्षांपूर्वी तत्कालीन जिल्हाधिकारी श्री परदेशी यांनी कंधार शहरांतील अतिक्रम हटाव मोहीम राबवली होती, तेव्हापासून कंधार शहरातील व्यापारी हा पाल टाकून व्यापार करत होता. प्रा.मनोहर धोंडे यांच्या अथक प्रयत्नांतून २५० व्यापाऱ्यांना लॉट पद्धतीने दुकानाचे प्लॉट वाटपाची प्रक्रिया पुर्ण करण्यात आली,कंधार शहरात व्यापाऱ्यांची दुकाने पाडून सर्व व्यापाऱ्यांना विस्थापित केले होते. मागील १२ वर्षापासून कंधारच्या व्यापाऱ्यांनी आमदार, खासदार,मंत्री व मुख्यमंत्री यांच्यासह न्यायालयात ही दाद मागितली होती परंतु व्यापाऱ्यांना न्याय मिळाला नव्हता.

दि.३० जून २०२४ रोजी हा विषय घेऊन व्यापारी पहिल्यांदा बहुजन नेते प्रा मनोहर धोंडे यांना भेटले असता व्यापाऱ्यांना न्याय मिळवून देण्याचा शब्द प्रा धोंडे यांनी दिला होता.१२ वर्षांपासून प्रलंबित असलेला व्यापाऱ्यांचा प्रश्न अवघे ३ महिने ८ दिवसात प्रा मनोहर धोंडे यांनी कायद्याच्या चौकटीत केलेल्या मांडणीमुळे निकाली निघाला असून लॉट पद्धतीने आज कंधारच्या २५० व्यापाऱ्यांना १० १५ फूट आकाराचे प्लॉटचे ३ वर्षांच्या भाडे तत्वावर वाटप करण्यात आले आहे.. हा विषय घेऊन प्रा. धोंडे यांनी जिल्हाधिकारी व पालकमंत्री यांच्याशी भेटून जागा मिळवून देण्याचे आश्वासन दिले होते. दि.८ ऑक्टोबर रोजी जागा वाटपाच्या संदर्भामध्ये नगरपालिकेच्या वतीने संत नामदेव महाराज मंगल कार्यालयात ड्रा करण्यात आला,एकूण ४३३ अर्जदारांपैकी २५० व्यापाऱ्यांना आज दुकानाचे गाळे मिळाले आहेत त्या सर्व व्यापाऱ्यांचे दुकाने मिळाली आहेत,परंतु ज्या उर्वरित व्यापाऱ्यांना गाळे मिळाले नाहीत त्यांनाही नगरपालिकेच्या उर्वरित जागेवर प्लॉट करून दुसऱ्या टप्प्यामध्ये लवकरच प्लॉट मिळवून देण्यासाठी प्रा मनोहर धोंडे प्रयत्नशील आहेत,त्यामुळे उर्वरीत व्यापाऱ्यांनी खचून जाऊ नये असे आवाहन प्रा धोंडे यांनी केले आहे.पुनःश्च एकदा कंधारच्या व्यापाऱ्यांच्या एकजुटीचे आणि आज दुकानचे गाळे मिळालेल्या २५० व्यापाऱ्यांचे तसेच कोणत्याही राजकीय दबावाला बळी न पडता कायद्याच्या चौकटीत राहून पारदर्शी पद्धतीने २५० गाळे वाटपाची प्रक्रिया पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी मा अभिजित राऊत साहेब, आणि नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कंधारचे तहसीलदार मा.रामेश्वर गोरे यांच्या सह प्रशासनाचे,नायब तहसीलदार चामनेर मॅडम, प्रा मनोहर धोंडे,बोकारे पुंडलिक, अभियंता दीपक झाडे, सतीश वरफडे, शेख आझर, राजेश जोंधळे, राकेश जोंधळे, गोविंद लुंगारे, सतीश बडवणे, यासह अनेक कर्मचारी या प्रक्रिया सहभागी होते.

**मी व्यापाऱ्यांना दिलेला शब्द पूर्ण केला आहे. मी कोणताही आमदार किंवा खासदार नसलो तरी मला कायद्याचा अभ्यास असल्यामुळे महाराष्ट्रातील अनेक भागात मोठे प्रकरण मी हाताळले आहेत.कंधारच्या व्यापाऱ्यांचा विषय माझ्यासाठी खूप छोटे होता.या कामात श्रेय घेण्यासाठी अनेकांनी विघ्न आणण्याचा प्रयत्न केला परंतु त्याला मी पुरून उरलो आहे. ज्या व्यापाऱ्यांना आज ड्रॉमध्ये दुकाने भेटले नाही,अशा व्यापाऱ्यांनी नाराज होण्याची गरज नाही मनोहर धोंडे यांच्या पाठीशी असून येणाऱ्या काळात त्यांनाही मी न्याय मिळवून देणार आहे. व्यापाऱ्यांना दुकाने मिळावे हीच माझी भावना होती श्रेय घेण्याची मला गरज नाही या कामाचे कोणाला श्रेय घ्यायची त्यांनी खुशाल घ्यावे. व्यापारी बांधवानो तुम्ही ज्या पद्धतीने एकजूट दाखवली त्याच पद्धतीने येणाऱ्या काळातही एकजुटीला दाखवा आपल्याला अनेक लढाया लढून कंधारचा विकास करायचा आहे.सदरील दुकाने हे तीन वर्षासाठी असले तरी तुम्हाला कायमस्वरूपी कसे करून द्यायचे ते मी बघेल**

**–प्रा.मनोहर धोंडे, सेवा जनशक्ती पार्टी पक्षप्रमुख**

# मच्छिंद्रनाथ गडाप्रमाणेच,रेणूकाई देवस्थान भाविक–भक्तांसाठी पर्यटन स्थळ करणार–सुरेश धस



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी । अण्णासाहेब साबळे**

मतदारसंघातील सावरगांव मच्छिंद्रनाथ गड,आष्टी पिंपळेश्वर मंदिर,नागतळा नागनाथ देवस्थान,पिंपळवंडी आश्वलिंग देवस्थान,वाळूंज भैरवनाथ देवस्थान,मुर्शदपुरचे माऊली मंदिर या सर्व देवस्थानसाठी आपण भरभरून निधी दिला आणि त्याप्रमाणेच बेलगांवच्या रेणूकामातेच्या विकासाची भरभरून निधी दिला आणि भविष्यात हे मोठे तिर्थ पर्यटन स्थळ करण्यासाठी आपण कायम प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन माजीमंत्री सुरेश धस यांनी केले. आष्टी तालुक्यातील बेलगांव येथे १२ कोटी ३१ लक्ष रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ सोमवार (दि.७)रोजी सकाळी १० वा.माजीमंत्री सुरेश धस यांच्याहस्ते करण्यात आले.यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ड.साहेबराव म्हस्के,रावसाहेब पोकळे,नगराध्यक्ष जिया बेग,कल्याण पोकळे,सरपंच प्रविण वारे,माजी पं.स.सदस्य किरण पोकळे,खंडु जाधव,आत्माराम फुंदे यांच्यासह आदि मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.पुढे बोलतांना धस म्हणाले,रेणुकामाता मंदिरास ४ कोटी,बेलगांव ते मांडवा रस्ता ३ कोटी व जलजीवन काम असे एकूण बारा कोटी ३१ लक्ष रूपायांची कामे येथे मंजूर केले आहेत.जलजीवन योजना ही देशाचे पंतप्रधान यांनी लक्ष घालून देशातील प्रत्येक गावात जल और नल ची योजना प्रभावीपणे राबवली आहे.सार्वजनिक कामे कसे करायची याचे उत्तम उदाहरण पाहायचे असेल तर आपल्या मतदारसंघातील कुसूळंब येथील प्राथमिक आरोग्य केंद्र पाहा मग कळेल की,काम कसे असावे. बेलगांवचे सरपंच प्रविण वारे म्हणाले,आत्तापर्यंत बेलगांवला एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी कोणीच दिला नाही.मात्र,धस आण्णांनी आपल्या गावाला एकाचवेळी १२ कोटी निधी देणारा एकमेव नेता ठरला आहे.आणि त्यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या प्रमाणावर विकास कामे करून गावचा कायापालट करणार असल्याचे वारे यांनी सांगितले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन अमृत पोकळे यांनी केले तर आभार शिंदे मामा यांनी मानले.

# खानवटे येथील निकृष्ट गटर योजनेच्या कामांचे मुल्यांकन देणाऱ्या अधिकाऱ्यांचे निलंबन होणार का ?

## गटविकास अधिकारी यांचे कार्यकारी अभियंता यांना पत्र




■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**दौंड । बबनराव धायतोंडे**

खानवटे ता.दौंड येथील भूमिगत गट योजनेचे काम हे १५ वा वित्त आयोगातून तिन ठिकाणी झाले असून.हे काम शासकीय गायरान गट नंबर २८८ मध्ये झालेले आहे.या कामाची कसलीही परवानगी जिल्हाधिकारी पुणे यांच्याकडून घेतलेली नसून सदरचे क्षेत्र हे जिल्हाधिकारी पुणे यांच्या मालकीचे असून विनापरवाना खोदाई करून गटर योजनेचे काम शासकीय जागेत करण्यात आले आहे.तसेच झालेले काम हे अतिशय निकृष्ट दर्जाचे केले असून,शाखा अभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती दौंड आणि उपअभियंता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती दौंड यांनी कामाची पाहणी न करता,काम इस्टिमेट नुसार न करता,गटरचारीचे खोदाईचे काम इस्टिमेट प्रमाणे न करता,चेंबरची संख्या कमी करून बांधकाम केले आहे, व लांब अंतरावर टाकलेले आहेत.तसेच या गट योजनेची होदाईचे काम फक्त एक ते दीड फूट खोल खोदलेले आहे.त्यामुळे गटरपाईप लाईन ही जमिनीच्या वरच असून ती फुटण्याची दाट शक्यता आहे.तसेच चेंबर जास्त अंतरावर असल्याने गटचारी जाम (ब्लॉक) होऊन लिकेज होऊन दुर्गंधी पसरण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे या कामात लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झालेला आहे.म्हणून संबंधित कामाविषयी माजी सरपंच बबनराव धायतोंडे यांनी गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे,जिल्हा अधिकारी पुणे यांच्याकडे लेखी तक्रार करून संबंधित दौंड पंचायत समिती चे पाणी पुरवठा विभागाचे शाखा अभियंता व उपाभियंता यांना निलंबित करण्याची मागणी केली आहे.त्यामुळे गटविकास अधिकारी पंचायत समिती दौंड यांनी कार्यकारी अभियंता पा.पु.विभाग जि.प.पुणे यांना आपल्या स्तरावरून चौकशी करण्यात यावी असे दि.०७/१०/२०२४ रोजी लेखी कळविले आहे. त्यामुळे आता पाणीपुरवठा विभाग पंचायत समिती येथील शाखा अभियंता व उपअभियंता यांच्या वरती काय कारवाई होणार याकडे सर्व खानवटे ग्रामस्थांचे लक्ष लागून राहिले आहे.

# नायगाव विधानसभा निवडणूक रिंगणात रेखा देवकर उतरणार

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । प्रतिनिधी**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुका अगदी जवळ येत असल्या तरी गेल्या दोन ते तीन महिन्यापासूनच इच्छुक उमेदवार यांनी नायगाव मतदार संघात दौरे करून मतदारांशी भेटीगाठी चर्चा बैठका भंडारा व इतर लहान मोठे कार्यक्रम घेऊन मतदारांची आपली खरी ओळख करून देत आहेत ,गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या रेखा बनसोडे देवकर हे देखील आपल्या असलेल्या लोकांशी संपर्क साधित आपण निवडणूक रिंगणात उतरणार आहोत असे ते पत्रकारांशी बोलताना आपली भूमिका स्पष्ट केले.



नायगाव मतदार संघातील असं एकही गाव नाही की तिथे रेखा देवकरांचे नाव नाही एवढा मोठा परिचय आपल्या सामाजिक कार्यातून रेखा देवकर यांनी दाखवून दिले, सुशिक्षित तरुणांना बचत गट महिलांना लहान मोठ्या उद्योगासाठी त्यांनी कर्ज मिळवून दिले तर निराधार महिलांना विविध कार्यक्रमातून साडी लुगडे वाटप केले, गरीब कुटुंबातील मुलीच्या लग्नासाठी त्यांनी भरीव मदत केली अशा अनेक कामामुळे त्यांचा मोठा चाहता वर्ग बनला आहे,कामाई बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने किंवा आपल्या वाढदिवसानिमित्त रुग्णांना फळे वाटप मुसाफिर भटके लोकांना कपडे चादर शाली वाटप करून आपल्या मनाचा ते मोठेपणा सातत्याने दाखवीत आलेले आहेत ,अनाथाची आई, रेखाताई. ही त्यांची ओळख बनली आहे, तृतीयपंथी असलेल्या रेखा देवकर हे आपल्या घरी यावे घरातील संकट दूर जाऊन घरात लक्ष्मी नांदते अशी काही धार्मिक लोकांची भावना असते म्हणून लग्न वाढदिवस नामकरण साक्षगंध सोहळ्यानिमित्त रेखा देवकर यांना निमंत्रित करून लोकांनी सन्मानित केले असे असताना त्यांची चाहते शिष्यगण देखील मोठ्या प्रमाणात नायगाव मतदारसंघात आहेत, राजकारण आणि निवडणूक ही काही कोणाची मक्तेदारी नाही राजकारणातूनच खरा विकास होते म्हणून आपण आपल्या चाहत्या वर्गांच्या बळावर निवडणूक सर्व ताकदीनशी लढवणार आहोत असे रेखा देवकर पत्रकारांशी बोलताना म्हणाले.आपण कोणत्या प्रमुख मुद्द्यावर निवडणूक लढविणार आहात असा प्रश्न पत्रकारांनी केल्यानंतर रेखा देवकर म्हणाल्या की गेल्या अनेक वर्षापासून गोरगरीब लोकांची प्रगती सुधारली नाही उलट त्यांचे संसार देशधडीला लागले आहेत ,खऱ्या अर्थाने लोकशाही निवडणूक आजवरच्या नेत्यांनी लढविली नाही तर लोकांना मजबूर करून त्यांचा फायदा घेत आलेले आहेत, म्हणुन श्रीमंत हे श्रीमंत होत गेले आणि गरीब ही गरिबीच राहिली मला खात्री आहे की लोकांनी निवडणूक मध्ये निवडून देतील आणि आपलं एकच लक्ष राहील की शेतकरी शेतमजूर कष्टकरी यांच्या विकासात्मक आपले लक्ष राहील असेही त्या म्हणाल्या की प्रस्थापित राजकारणी लोकांच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालण्यासारखी माझी उमेदवारी असेल.

# राष्ट्रीय महामार्गावरील उस्माननगर चौकात पोलीस चौकी सह विजेचे दिवे लावा

## व्यावसायिकांसह प्रवाशांची मागणी



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**उस्माननगर । गणेश लोखंडे**

उस्माननगर ( ता. कंधार) येथील नव्याने निर्माण केलेल्या राष्ट्रीय महामार्गावर सध्या मोठ्या प्रमाणावर वाहनांची वर्दळ वाढली आहे. नांदेड– उस्माननगर– उदगीर व नांदेड– उस्माननगर–कौठा–बिदर या दोन राष्ट्रीय महामार्ग उस्माननगर येथील उदासीबुवा चौकात एकत्रित येतात. या ठिकाणी अनेक लहानमोठ्या व्यापारी, तरुणांनी विविध प्रकारच्या दुकानांची तात्पुरती उभारणी केली आहे. याठिकाणी विजेच्या अभावी सायंकाळी,रात्री सर्व व्यवहार बंद करून परतावे लागते.

कंधार, जांब, जळकोट, उदगीर, हळदा, कौठा, मुखेड येथील विविध प्रकारच्या वाहनांची नांदेड येथे जाण्यासाठी अंतर खूप कमी होते म्हणून मोठ्या प्रमाणावर वर्दळ वाढली आहे. या चौकात वीजपुरवठा केल्यास तरुणांच्या विविध प्रकारच्या व्यवसायांना मोठ्या प्रमाणावर संधी उपलब्ध होवू शकते.

दरम्यान उस्माननगर येथे पोलीस ठाणे अस्तित्वात आहे. उस्माननगर बीट अंतर्गत उदासीबुवा चौकात एका पोलीस चौकीची उभारणी करण्यात यावी. अशी मागणी व्यापारी,वाहनधारक, प्रवासी, गावकरी यांच्या कडून व्यक्त केली जाते आहे.

# धर्मभूषण ॲड दिलीप ठाकूर यांना पद्मश्री पुरस्कार देण्यात यावे डॉ हंसराज वैद्य यांचे प्रतिपादन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**



सातत्याने चालणारा कायापालट सारखा उपक्रम भारतात कुठेही होत नसल्यामुळे धर्मभूषण ड. दिलीप ठाकूर यांना पद्मश्री पुरस्कार देऊन गौरवण्यात यावे असे प्रतिपादन नांदेड भूषण डॉ. हंसराज वैद्य यांनी केले.पन्नासाव्या महिन्याच्या उपक्रमात ५२ भ्रमिष्टांना डॉ. वैद्य यांच्या हस्ते कपडे व शंभर रुपयाची बक्षीसी देऊन कायापालट करण्यात आला.

ऑक्टोबर महिन्याच्या पहिल्या सोमवारी गोवर्धन घाट येथे ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष डॉ. हंसराज वैद्य यांनी सदिच्छा भेट दिली. या उपक्रमाची डॉ. वैद्य यांनी विस्तृतपणे माहिती घेतली.कडाक्याची थंडी असो अथवा मुसळधार पाऊस दिलीप ठाकूर यांचा कायापालट हा उपक्रम कधी रद्द झाला नाही.दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी भाजपा नांदेड महानगर, लायन्स क्लब नांदेड सेंट्रल,अमरनाथ यात्री संघ, सन्मित्र फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नांदेड येथे कायापालट उपक्रम राबविण्यात येतो.यासाठी खा.अशोकराव चव्हाण,माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, खा.डॉ. अजित गोपछडे, मराठवाडा प्रदेश संघटन मंत्री संजय कोडगे,महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, भाजपा जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे व ड. किशोर देशमुख, ला. योगेश जैस्वाल,ला. शिवाजीराव पाटील यांचे मार्गदर्शन मिळत असते. सोमवारी पहाटे शहरातील विविध भागातून भ्रमिष्ट, कचरा वेचणारे, अपंग, बेघर नागरिकांना सुरेश शर्मा, कामाजी सरोदे,संजयकुमार गायकवाड यांनी स्वतःच्या दुचाकी वर बसवून गोवर्धन घाट पुलाखाली आणले. स्वयंसेवक राजूअण्णा पस्पुनुर यांनी सर्वांची काळजीपूर्वक कटिंग दाढी केली.भाजपा कामगार आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुरेश लोट यांच्या सहकार्याने स्नान करण्याची व्यवस्था करण्यात आली. कित्येक दिवस आंघोळ न करणाऱ्या या नागरिकांना विलास जोगदंड यांने साबण लावून स्नान घातले.त्यानंतर नवीन अंडरपॅन्ट, बनियन व पॅन्ट शर्ट वाटप करण्यात आले.ही भ्रमिष्ट मंडळी कायापालट होण्यासाठी तयार व्हावे म्हणून शंभर रुपयाची बक्षिसी व चहा फराळाची व्यवस्था केली होती.पूर्वीचे मळके कपडे,अवास्तव वाढलेले केस आणि नंतरची चकाचक करण्यात आलेली कटिंग दाढी व नवीन कपडे घातल्यामुळे उपेक्षितांचा झालेला कायापालट पाहून सर्वजण हरखुन गेले.डॉ.अर्जुन मापारे व डॉ.दि.बा.जोशी यांनी आजारी असलेल्या व्यक्तींची तपासणी केली. जखमांची मलमपट्टी करून मोफत औषधे दिली. कायापालट उपक्रम संपल्यानंतर सुरेश लोट यांच्या मार्गदर्शनाखाली परिसराची स्वच्छता करण्यात आली. दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी कायापालट हा उपक्रम राबविण्यात येत असल्यामुळे अशा बेघर व्यक्ती आढळल्यास नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या रविवारी त्याची माहिती द्यावी असे आवाहन संयोजक दिलीप ठाकूर यांनी केले आहे.

## धानोरा रोड परिसरातील नागरिकांचा विधानसभा निवडणुक मतदानावर बहिष्कार



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**बीड । विजय रोडे**

शहराशी अनेक गावांना जोडणारा बीड शहरातील एक प्रमुख रस्त्यात गणना असलेला धानोरा रोड नगर रोड ते पालवन चौक या दीड ते दोन किलोमीटर अंतरात रस्त्याची अक्षरशः चाळणी झाली आहे शिवाय अनेक छोटे मोठे अपघातही यामुळे होत आहेत त्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धानोरा रोडच्या कामासंदर्भात लोकशाही मार्गाने आंदोलन, उपोषण करण्यात आले यावेळी हजारो लोक, लहान मुलं रस्त्यावर उतरले परंतु बीड नगरपालिका प्रशासन व जिल्हा प्रशासन यांना रस्त्याच्या समस्येबाबत गांभीर्य नसल्याची बाब या निमित्ताने समोर येत आहे.

उपोषण वेळी बीड नगरपरिषद कार्यालय यांच्या पत्रानुसार अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही त्यामुळे येणाऱ्या विधानसभा निवडणुक २०२४ मतदानावर धानोरा रोड परिसरातील सुज्ञ नागरिकांनी बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला असल्या बाबत चे जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यात आले आहे.

# लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघात ओबीसीचाच आमदार होणार-प्रा.हाके

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**



आगामी लोहा-कंधार विधानसभा निवडणुकीत ओबीसीचा आमदार होईल, असा विश्वास ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांनी व्यक्त केला.


देगलूर येथील कार्यक्रम आटोपून ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके कंधार येथे आले होते. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी प्रा.लक्ष्मण हाके म्हणाले, लोहामध्ये भव्य ओबीसी समाजाचा मेळावा पार पडला. या मेळाव्याने आपल्या विजयाची मुहूर्तमेढ रोवली आहे. आपल्या माणसाच्या उमेदवारीसाठी रात्रीचा दिवस करु. कुणाचे पाय धरायची वेळ आली तर पाय पण धरु. ओबीसी समाजाचा माणूस निवडून आणू. यंदा लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघात ओबीसीचा आमदार होणार आहे. कंधार आणि लोह्याचा खरा आवाज महाराष्ट्राच्या विधानसभेत घुमणार आहे. आगामी लोहा-कंधार विधानसभा निवडणुकीत दोन ते चार जंगी सभा घेणार आहे. लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघावर बहुजनाचा झेंडा फडकविणार आहे. आजपर्यंत ओबीसी आरक्षणाच रक्षण बौद्ध समाजाने केलं आहे. आता कुठं ओबीसी समाज आरक्षण बाबत जागृत झाला आहे.

यावेळी ओबीसी आरक्षणाचे आंदोलक नवनाथ वाघमारे, गोल्ला गोलेवार समाजाचे नामदेव आयलवाड,माजी जि.प.सदस्य चंद्रसेन पाटील सुरनर, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अंगद केंद्रे, आंबुलग्याचे सरपंच प्रतिनिधी माधव मुसळे, लोहा कृउबा समितीचे संचालक केरबा केंद्रे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष गोपीनाथ केंद्रे,संगमवाडीचे सरपंच ज्ञानोबा घुगे,अरुण करेवाड,शाहीर विलास ढवळे, प्रेमानंद गायकवाड, बबन जोंधळे, विहान कदम आदींसह ओबीसी समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### फटाक्यांचीआतषबाजी व भव्य सत्कार

**यावेळी ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांचे कंधार शहरातील महाराणा प्रताप चौकामध्ये आगमन होताच फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.त्यानंतर ओबीसी समाजाच्या वतीने प्रा.लक्ष्मण हाके याचा भव्य सत्कार करण्यात आला.**

## नवज्योत दुर्गा उत्सव मंडळ रामनगर लोणार येथे भाविकांची गर्दी आकर्षक ठरत आहे भुल-भुलया भूतांची गुफा



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोणार । विनायक कुटे**

जगप्रसिद्ध लोणार सरोवर येथे नवज्योत दुर्गा उत्सव मंडळ यांनी दुर्गा मातेची आकर्षक मूर्ती व रस्त्यावर ठिकठिकाणी झेंडा लावून मंडळाकडे जाण्यासाठी मार्ग दाखवला आहे.रोज सकाळ संध्याकाळ आरती घेतली जाते व विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते डान्स गरबा दांडिया व अनेक खेळांचे आयोजन करण्यात येते आरती साठि महिला पुरुष लहान मुले वयोवृद्ध यांची उपस्थिती असते.मंडळाच्या वतीने तयार केलेल्या भुताची गुफेजवळ मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित राहुन कोणताहि गैरप्रकार घडू नये याची विशेष काळजी घेतली जाते भूल -भूलया भुताची गुफा खास आकर्षण ठरत असून हजारो भक्त भाविक हि भुताची गुफा पाहण्यासाठी गर्दी करत आहेत. विशेष म्हणजे या गुफेत भुताचे आवाज करीत काळोखात भुताचे सोंग घेऊन काही कलाकार मनोरंजन करतांना दिसतात विशेष म्हणजे या भुताची गुफा पाहण्यासाठी लहान मुले महिला पुरुष तोबा गर्दी करतांना दिसत आहे.तसेच लहान मुले वयोवृद्ध यांना या गुफेत जाणार नाही याची काळजी घेतली जाते . तसेच शिस्तबद्ध पद्धतीने मंडाळचे कार्यकर्ते कोणाला काही त्रास होणार नाही याची विशेष खबरदारी घेतली जाते दुर्गा मातेची आकर्षक मुर्ती व भुल भुलया भुताची गुफा पाहण्यासाठी एकवेळ आवश्यक यावे व मडळाचा आनंद द्विगुणित करावा असे मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष सदस्य यांनी सांगितले.

# लोह्यात माजलगाव येथील घटनेच्या निषेधार्थ सराफा बाजार कडकडीत बंद

## नराधम शिक्षकांवर कठोर कारवाई करण्याची मागणी

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



माजलगाव येथील सोनार समाजातील ५ वर्षांच्या अल्पवयीन मुलीवर शाळेतील शिक्षकांनी लैंगिक अत्याचार केल्याच्या निषेधार्थ लोहा येथील समस्त सराफा व सुवर्णकार संघटनेच्या वतीने सराफा बाजार कडकडीत बंद ठेऊन सदरील घटनेचा निषेध करुन आरोपींना कठोरात कठोर शिक्षा करावी अशी मागणी समस्त सराफा व सुवर्णकार संघटनेच्या वतीने लोहा तहसीलदार व लोहा पोलिस निरीक्षक यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

पुढे निवेदनात असे नमूद केले की, बीड जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात माणुसकीला काळीमा फासणारी घटना घडली आहे. अलीकडच्या काळात बाल लैंगिक अत्याचाराचे प्रमाण फार वाढले आहे. शैक्षणिक क्षेत्रासारख्या पवित्र ठिकाणी ही मुली सुरक्षीत नाहीत. दि. २७-९-२०२४ रोजी एका नराधम शिक्षकांने सोनार समाजातील ५ वर्षीय अल्पवयीन मुलीवर अत्याचार केले सदरील शिक्षक व शिक्षण संस्थेवर राजकीय वरदहस्त असल्यामुळे पोलीसांनी एवढ्या गंभीर घटनेचा गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ केली. शेवटी सदरील प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर प्रकारणात गुन्हा दाखल करण्यात आला आहे . तेव्हा या प्रकरणातील आरोपीस जामीन देण्यात येऊ नये. सदरील खटला हा फास्ट ट्रॅक कोर्टात चालविण्यात यावा आदी मागण्या सराफा व सुवर्णकार संघटनेच्या वतीने करण्यात येऊन माजलगाव घटनेचा तीव्र निषेध करुन सराफा बाजार कडकडीत बंद ठेवून आरोपींवर कठोरात कठोर कारवाई करावी अशी मागणी करण्यात आली आहे.

## खा.नितीन पाटील जाधव यांच्या उपस्थितीत बॉयलर अग्नी प्रदिपन व गव्हाण पुजन संपन्न

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव गायकवाड**

डॉ. शंकरराव चव्हाण जागरी अँड ॲग्रो प्रॉडक्ट्स प्रा ली कुसुमनगर वाघलवाडा येथे द्वितीय बायलर अग्निप्रतीपादन व गव्हाण पूजन गळीत हंगाम सन २०२४-२५ च्या वेळी स्टाल लावण्यात आला होता पश्चिम महाराष्ट्रातील सहकार क्षेत्रातील एक अनुभवी नेते नवनिर्वाचित राज्यसभा खासदार आदरनिय मा खा नितीन काका पाटील जाधव सातारा व कारखान्याचे सर्वेसर्वा चेअरमन आदरनिय श्री मारोतावर कवळे गुरूजी, कारखायाचे सि ई ओ संदीप पाटील,एम डी अंबटवार साहेब, आपल्या कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील सर्व शेतकरी बांधवानी आणि कर्मचारी बांधवांनी स्टाल ला भेट देऊन संमाधान व्यक्त केले.




# लेखक शेखर फराटे लिखित 'एक प्रवास असाही' पुस्तकाचे प्रकाशन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**रांजणगाव । प्रतिनिधी**



तळेगाव ढमढेरे येथील सक्सेस क्लासेस येथे शेखर फराटे लिखित 'एक प्रवास असाही' या पुस्तकाचे प्रकाशन शिरुर तालुक्यातील नामांकित साहित्यिकांच्या हस्ते झाले. यापुर्वी शेखर फराटे यांच्या किंग मेकर, त्रिकोणी चौकोन, या कादंबर्यांबरोबरच पारावरच्या गोष्टी हा कथासंग्रही प्रकाशित झाला आहे.एक प्रवास असाही या पुस्तकातून शेखर फराटे यांनी त्यांच्या शालेय अनुभवांपासून ते आत्तापर्यंत आलेल्या अनुभवातून मानवी स्वभावांचे पैलू उलगडण्याचा छान प्रयत्न केला आहे. यातील सर्व अनुभव त्यांनी सत्य घटनांवर लिहिले आहेत.

'वाचनातून लिखाणाची कला अवगत झाली. शालेय जीवनापासून वाचणाची आवड असल्याने मी लेखक होऊ शकलो. खरं तर लेखक होणे हे माझे स्वप्न देखील होते. ध्येय, आवड आणि सर्वांच्या सहकार्याने ते शक्य झाले. असे मत शेखर फराटे यांनी यावेळी व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिरुरचे मसाप अध्यक्ष मनोहर परदेशी यांनी मराठी भाषेचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे म्हणून अनेक ग्रामीण लेखकांनी पुढे आले पाहिजे आणि खरं लिहीलं पाहिजे असे मत व्यक्त केले. यावेळी सचिन बेंडभर, कुंडलिक कदम,शरद रणदिवे, नानासाहेब गावडे, विवेकानंद फंड, बाळासाहेब कुंभार, यांनी आपले विचार व्यक्त केले व पुस्तकाला शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमप्रसंगी ,शिरुर तालुका ग्रंथालय संघ अध्यक्ष विवेकानंद फंड, गुरुनाथ पाटील, एकनाथ फराटे, आशुतोष ढमढेरे, आकाश भोरडे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मसापचे कार्याध्यक्ष प्रा. कुंडलिक कदम यांनी केले. तसेच कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेचे राज्य कार्यकारिणी सदस्य सचिन बेंडभर यांनी केले. आभार राहुल चातुर यांनी मानले.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904